महाराष्ट्र शासन
वनविभाग
उप वनसंरक्षक, ठाणे वनविभाग,ठाणे यांचेकार्यालय
ला.ब.शास्त्री मार्ग, मॅरेथॉनसर्कल, नौपाडा,ठाणे (प.) -400602
ईमेल-dycfthane@mahaforest.gov.in dcfthane@gmail.com
दुरध्वनी क्र.. - 022- 25421373 / 022- 25434349

LiFE Lifestyle for Environment

जा.क्र कक्ष-4/30/योजना/6335/सन 2025-26 दिनांक - 23 फेब्रुवारी, 2026.

वनक्षेत्रपाल ... यांचे कार्यालय
क्र. 2616
24/02/2026

विषय :- वन विभागाचे संगणकीकरण कार्यक्रमातंर्गत वन विभागाच्या क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांना मोबाईल व इंटरनेट डाटा वापराकरिता वाढीव रक्कम प्रदान करणेबाबत.

संदर्भ :-
1) महसूल व वनविभाग यांचेकडील शा.नि.क्र.एफएलडी-2019/प्र.क्र.258/फ-10,दि.2.2.2024.
2) वनक्षेत्रपाल मुंबई यांचेकडील पत्र क्र.कक्ष/योजना/1895,दि.8.12.2025.
3) वनक्षेत्रपाल ठाणे यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण/1511,दि.22.12.2025.
4) वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन) कल्याण स्थित ठाणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष/योजना/203,दि.10.12.2025.
5) वनक्षेत्रपाल कल्याण यांचेकडील पत्र क्र.कक्ष-2/योजना/848,दि.24.11.2025.
6) वनक्षेत्रपाल मुरबाड पूर्व यांचेकडील पत्र क्र.योजना/1564,दि.5.1.2026. (या कार्यालयास दि.13.1.2026 रोजी प्राप्त)
7) वनक्षेत्रपाल मुरबाड पश्चिम यांचेकडील पत्र क्र.योजना/820,दि.29.12.2025.
8) वनक्षेत्रपाल टोकावडा दक्षिण यांचेकडील पत्र क्र.कक्ष/अ/योजना/985,दि.16.1.2026. (या कार्यालयास दि.23.1.2026 रोजी प्राप्त)
9) वनक्षेत्रपाल टोकावडा उत्तर यांचेकडील पत्र क्र.आस्था/1164,दि.14.1.2026. (या कार्यालयास दि.20.1.2026 रोजी प्राप्त)
10) वनक्षेत्रपाल भिवंडी यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण/619,दि.15.12.2025. (या कार्यालयास दि.18.12.2025 रोजी प्राप्त)
11) वनक्षेत्रपाल पडघा यांचेकडील पत्र क्र.योजना/770,दि.12.1.2026. (या कार्यालयास दि.28.1.2026 रोजी प्राप्त)
12) वनक्षेत्रपाल बदलापूर यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण/1355,दि.7.12.2025. (या कार्यालयास दि.18.12.2025 रोजी प्राप्त)

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयादवारे क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना भ्रमणध्वनी करिता इंटरनेट डाटा सुविधा पुरविण्याकरिता रु.170/- ऐवजी रु.350/- प्रती महिना वाढीव मानधन रक्कम अदा करणेबाबत प्रमाणित करण्यांत आले आहे. व सदरचा खर्च विभागाचे संगणकीकरण करणे (2406 8669) या लेखाशिर्षा अंतर्गत 50 (इतर खर्च) या उपशिर्षातून भागविण्यांत येईल असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.2 ते 12 अन्वये वनक्षेत्रपाल सर्व यांनी मोबाईल व इंटरनेट डाटा वापराकरिता वाढीव रक्कम मिळणेकरिता अनुदान मागणी या कार्यालयास सादर केली आहे.

CamScanner

उपरोक्त संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यामधील बाब क्र.4 मध्ये शासन निर्णय एफएलडी-2019/प्र.क्र.258/फ-10,दि.21.10.2020 मधील तरतूदी / अटी व शर्ती अनुज्ञेय राहतील असे नमूद केले आहे. त्यानुसार सदरचे शासन निर्णयामधील नमूद अटी / शर्तीपैकी काही अटी / शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

D :- संबंधित क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी सेवेत रुजू होताच त्यांना स्वत:चा मोबाईल क्रमांक आणि IMEI क्रमांक विभागाचे संकेत स्थळावर नोंदवावेत आणि त्यास संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी व सहा.वनसंरक्षक वरिष्ठ अधिका-यांनी Digitally Endorse करावा व डाटा अपलोड करावा. तसेच कर्मचा-यांची बदली झाल्यास, बदली झालेल्या कर्मचा-यांनी स्वत:चा मोबाईल क्रमांक Register करणे व De-register करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचारी व वनपरिक्षेत्र अधिकारी यांची राहील.

E :- त्यावर संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचे मार्फत डाटा अपलोड करणे तसेच या पुढील पर्यवेक्षण आणि सनियंत्रण करण्याची जबाबदारी सुध्दा संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी / सहा.वनसंरक्षक / उप वनसंरक्षक यांची असेल.

F :- वापरकर्त्यांस मासिक खर्च एकूण रु.170/- देणे प्रस्तावित केले आहे. सदरहू देयक अदा करतांना संबंधित (वनपरिक्षेत्र अधिकारी / सहा.वनसंरक्षक) यांनी वापर सुनिश्चित केल्यानंतरच देयक अदा करावे

त्याअनुषंगाने संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी वरीलप्रमाणे (D ते F) तसेच शासननिर्णयानुसार कार्यवाही करुन डाटा अपलोड केला त्याचा वापर सुनिश्चित केल्याचे प्रमाणपत्र तसेच मोबाईल व इंटरनेट डाटा वापराकरिता यापूर्वी सदर कालावधीचे दि.2.2.2024 ते दि.31.12.2024 व दि.1.1.2025 ते 31.12.2025 देयक अदा करण्यांत नाही याबाबतचे प्रमाणपत्र सहा.वनसंरक्षक यांचेमार्फत विनाविलंब या कार्यालयास सादर करावे. तदनंतरच प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

(सचिन रेपाळ)
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वन विभाग,ठाणे**

प्रती,

वनक्षेत्रपाल मुंबई, ठाणे, कल्याण, मुरबाड पूर्व, मुरबाड पश्चिम, टोकावडा दक्षिण, टोकावडा उत्तर, भिवंडी, पडघा, बदलापूर व वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन) कल्याण स्थित ठाणे.

प्रत :- सहा.वनसंरक्षक (र.रा.प. व वन्यजीव) ठाणे, सहा.वनसंरक्षक (जं.का.स. व कॅम्पा) ठाणे.सहा.वनसंरक्षक (संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन) ठाणे व सहा.वनसंरक्षक भिवंडी यांचेकडे माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जा.क्र.कक्ष/योजना/2687/2025-26
ठाणे, 400602, दि. 24/02/2026

प्रतिलीपी - वनपाल सर्व / वनरक्षक सर्व यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता रवाना।

021 - त्यांनी पत्रात नमूद शासननिर्णयाप्रमाणे नमूद अटी/शर्ती प्रमाणे कार्यवाही करावी.

Range Forest Office
Mumbai (प्रा.)